N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** चांदुर बाजार

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0338 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/05/2024 16:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 28/03/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/05/2024

**Time From (वेळेपासून):** 15:45 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/05/2024 **Time (वेळ):** 16:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 046

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/05/2024 16:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 500 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय, ,चांदूर बाजार ज

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

<u>फिर्याद</u>

कॅम्प : चांदूर बाजार, जि.अमरावती
दिनांक : २४/०५/२०२४

माझे नाव नितीन नारायणराव धोटे, वय ४५ वर्षे, व्यवसाय : वितरक, दैनिक भास्कर, अमरावती, रा.पंचशिल चौक, साईसागर अपार्टमेंट, सुरभी ले–आऊट, तपोवन, अमरावती असे असुन मी नमुद पत्त्यावर परिवारासह राहतो. मी दिनांक २८/०३/२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती येथील पोलीस उपअधिक्षक श्री.मंगेश मोहोड यांचेकडे जावुन तक्रार दिली की, माझे वडील नामे श्री.नारायण पंढरीनाथ धोटे, वय ६२ वर्षे यांचे नावे मौजे उमरी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे शेत स.नं.४३ मध्ये २.०२ हेक्टर शेत आहे. सदर शेत माझे वडील यांनी त्यांच्या स्वमर्जीने माझा मोठा भाऊ नामे राजेंद्र नारायणराव धोटे आणि माझे नावावर प्रत्येकी ० हे ८१ आर याप्रमाणे आणि स्वत:चे नावावर ० हे ४० आर असे वाटणीपत्र करुन दिले आहे. त्याबाबत आम्ही दिनांक ०८/११/२०२३ तहसिल कार्यालय, चांदूर बाजार, जि. अमरावती येथे वाटणीपत्रानुसार कलम ८५/२ प्रमाणे फेरफार करण्याकरीता आदेश देण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. त्यावर सुनावणी होवून मा.तहसिलदार, चांदूर बाजार यांनी संबंधित तलाठी यांना प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी करणेस सांगितले व तसा अहवाल मागविला होता, तो अहवाल तलाठी यांनी तहसिल कार्यालय, चांदूर बाजार येथे सादर केला आहे.

त्या अनुषंगाने दिनांक २६/०३/२०२४ रोजी मी माझे वडील व मोठया भावासह तहसिल कार्यालय, चांदूर बाजार येथे गेलो असता मी तहसिलदार मॅडम नामे श्रीमती गितांजली गरड यांना भेटलो. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही आमचे कार्यालयातील लिपीक श्री.किरण बेलसरे यांना भेटून घ्या. त्यानंतर मी लिपीक श्री.किरण बेलसरे यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की, तुमचे वडीलांचे शेतीचे वाटणीपत्रानुसार फेरफार करणेबाबतचा आदेश मी तहसिलदार मॅडम यांचेकडून करुन देतो, त्याकरीता तुम्हाला तहसिलदार मॅडम नामे श्रीमती गितांजली गरड यांचेकरीता २०,०००/— रुपये आणि माझेकरीता ५,०००/— रुपये असे एकुण २५,०००/— रुपये दयावे लागतील. त्यावर मी त्यांना नंतर येवून भेटतो असे म्हणून तेथून निघुन आलो.

त्यानंतर दिनांक २८/०३/२०२४ रोजी सकाळी अंदाजे १०.०० वा. मला तहसिल कार्यालय चांदूर बाजार येथील लिपीक श्री.किरण बेलसरे यांचे मोबाईल क्र.९८९०१६१०२१ वरुन माझे मोबाईल क्र.८०५५९२८७२० वर फोन आला व त्यांनी मला मागणी केलेली लाच रक्कम २५,०००/— रुपये घेवून तहसिल कार्यालय, चांदूर बाजार येथे बोलाविले आहे. परंतु मला श्रीमती गितांजली गरड, तहसिलदार, चांदूर बाजार, जि.अमरावती व लिपीक श्री.किरण बेलसरे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांचेविरुध्द तक्रार देत आहे. माझा श्रीमती गितांजली गरड, तहसिलदार व श्री.किरण बेलसरे, लिपीक, दोन्ही : तहसिल कार्यालय, चांदूर बाजार, जि. अमरावती यांचेसोबत कोणताही जुना आर्थिक देवाणघेवाणीचा व्यवहार नसुन कोणत्याही प्रकारचे आपसी वैमनस्य नाही. तरी मी दिलेल्या तक्रारीवरुन श्रीमती गितांजली गरड, तहसिलदार व श्री. किरण बेलसरे, लिपीक, दोन्ही : तहसिल कार्यालय, चांदूर बाजार, जि.अमरावती यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात यावी ही विनंती" अशी तक्रार दिली.

त्यानंतर श्री.मोहोड साहेब यांनी मला दोघेजण पंच म्हणून बोलाविल्याचे सांगुन त्यांचा १) डॉ.कुंदन सुरेश पाटील, सहा.प्राध्यापक व २) श्री.निलेश विजयराव अनासने, प्रयोगशाळा सहायक, दोन्ही नेमणूक : शासकिय औषध निर्माणशास्त्र महाविदयालय, अमरावती असा परिचय करुन दिला. तसेच सापळा पथकातील इतर सदस्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर मी पंचासमक्ष माझे लेखी तक्रार दिली. त्यावेळी श्री.मोहोड साहेब यांनी मला व पंचांना सांगितले की, आता आपण अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती येथून शासकिय वाहनाने चांदूर बाजार येथे जावुन तहसिल कार्यालय, चांदूर बाजार येथील तहसिलदार श्रीमती गरड व लिपीक श्री.बेलसरे यांची लाचेचे मागणीसंबंधाने पडताळणी करणार आहोत.

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नितीन नारायणराव धोटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पंचशिल चौक, साईनगर अपार्टमेन्ट,सुरभी लेआउट तपोवन अमरावती, फ्रेजरपूरा,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पंचशिल चौक, साईनगर अपार्टमेन्ट,सुरभी लेआउट तपोवन अमरावती, फ्रेजरपूरा,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती गितांजली नामदेवराव गरड | | | 1. नागरवाडी बंगला शासकीय निवास्था, चांदूरबाजार,चांदुर बाजार,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | किरण दामोधर बेलसरे | | | 1. शिरजगाव बंड , ताचांदूर बाजार, चांदुर बाजार,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

त्यानुसार श्री.मोहोड साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्वजण शासकिय वाहनाने अमरावती येथून चांदूर बाजार येथे पोहचल्यावर श्री.मोहोड यांनी दिलेल्या सुचनेनुसार पो.ना.युवराज राठोड यांनी माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन दिले व मला पंच क्र.१ डॉ. पाटील यांचेसह तहसिल कार्यालय, चांदूर बाजार येथे श्रीमती गरड, तहसिलदार व श्री.बेलसरे, लिपीक यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. त्याठिकाणी माझी भेट श्री.बेलसरे यांचसोबत झाली, मी त्यांना **काय झाल मंग** असे म्हटले. त्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी **तुम्ही सांगितलच नाही त काय करणार मी, तुम्ही सांगा अन घेवुन जा पटकन काय आहे त मोकळ करुन टाका** असे म्हटले. त्यावर मी बेलसरे यांना **काय म्हणजे किती** असे म्हटले. त्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी मला **तुम्हाले सांगितल न ते कालच त बोललो आपण** असे म्हटले. त्यावर मी श्री.बेलसरे यांना **थोडस तरी याच्यात कमी जास्त सांगा तुम्ही आकडा** असे म्हटले. त्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी मला दहा मिनीट थांबणेस सांगितले.

त्यानंतर काहीवेळ थांबल्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी मला यांना **सांगा ना मंग काय करता त** असे म्हटले. त्यावर मी बेलसरे यांना **तुम्ही एक थोडस** असे म्हटले. त्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी मला **तुमच तयार आहे सगळ** असे म्हटले. त्यावर मी श्री.बेलसरे यांना **तुम्ही विस न पाच सांगितले पंचवीस** असे म्हटले असता लिपीक श्री.बेलसरे यांनी **बरोबर** असे म्हटले. त्यावर मी लिपीक श्री.बेलसरे यांना **पंचवीस गरीबाले लय होते ना राजेहो** असे म्हटले. त्यावर श्री.बेलसरे यांनी मला **गरीब आहे का तुम्ही** असे म्हटले. त्यावर मी लिपीक श्री.बेलसरे यांना **कशी गोष्ट करता तुम्ही** असे म्हटले असता त्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी **बर पाच कमी करुन देजा** असे म्हटले. त्यावर मी श्री.बेलसरे यांना **आ विस** असे म्हटले. त्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी मला **हव** असे म्हटले. त्यावर मी श्री.बेलसरे यांना **पंधरा हजार विस हजार लय होतीन ना** असे म्हटले. त्यावर श्री.बेलसरे यांनी मला **जमत नाही ते काम** असे म्हटले. त्यावर मी श्री. बेलसरे यांना **आ. कावुन जमत नाही काय कारण आहे** असे म्हटले. त्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी मला **मॅडम काय घेईल मले काय मी काय घेवू त्याच्यातले** असे म्हटले. त्यावर मी लिपीक श्री.बेलसरे यांना तहसिलदार मॅडम बाबत विचारणा केली असता, लिपीक श्री.बेलसरे यांनी तकारदार यांना तहसिलदार मॅडम जेवायला गेल्याबाबत सांगितले. त्यानंतर मी लिपीक श्री. बेलसरे यांना **थोड काही कमी करा ना** असे म्हटले असता, लिपीक श्री.बेलसरे यांनी **केले ना ते आता पाच कमी केले ना** असे म्हटले. त्यावर मी लिपीक श्री.बेलसरे यांना नाही, नाही हे पहा किरण भाऊ वडील दवाखान्यात आहे म्हणून मी असे म्हटले. त्यावर लिपीक श्री.बेलसरे यांनी मला **नाही त, पाच कमी करुन दया, पुरा क्लिअर विषय सांगितला ना मी तुम्हाला** असे म्हटले. त्यानंतर मी आणि पंच क्र.१ डॉ.पाटील असे तहसिलदार श्रीमती गरड यांना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेलो असता, श्रीमती गरड, तहसिलदार हया लोकसभा निवडणुकीचे कामाने अचलपूर येथे गेल्या असल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यामुळे मी व पंच क्र.१ डॉ.पाटील असे तेथून निघुन आलो, त्याठिकाणी पो.ना.युवराज राठोड यांनी माझेजवळील व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद केले.

सदर पडताळणी दरम्यान श्री.बेलसरे यांनी स्वत: करीता व तहसिलदार श्रीमती गरड यांचेकरीता तडजोडीअंती २०,०००/— रुपये लाचेची माझेकडे मागणी केली. परंतु श्रीमती गरड, तहसिलदार हया लोकसभा निवडणुकीचे कामाने अचलपूर येथे गेल्या असल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यावेळी पुढील पडताळणी कारवाई दिनांक ०१/०४/२०२४ रोजी करण्यात ठरविण्यात येवून श्री.मोहोड साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्वजण असे शासकिय वाहनाने अमरावती येथे परत येथे येवून पंचनामा कारवाई करण्यात आली.

त्यानंतर दिनांक ०१/०४/२०२४ रोजी व दिनांक ०२/०४/२०२४ रोजी श्री.मोहोड साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्वजण शासकिय वाहनाने अमरावती येथून चांदूर बाजार येथे गेलो. परंतु श्रीमती गरड, तहसिलदार हया दोन्ही वेळेस लोकसभा निवडणुकीचे कामाने अचलपूर येथे गेल्याचे तसेच त्या निवडणुकीचे कामात व्यस्त असल्याने त्यांची भेट

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

कायमी
अप क्र. व कलम ○:- 338/2024 कलम 7 A, 12भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988
फिर्यादी ○:- नितीन नारायणराव धोटे, वय 45 वर्षे, व्यवसाय - वितरक दैनिक भास्कर अमरावती रा.पंचशिल चौक, साईनगर अपार्टमेन्ट सुरभी लेआऊट तपोवन अमरावती मो क्र 8055928720
आरोपी ○:- 1. आलोसे क्र.1 श्रीमती गितांजली नामदेवराव गरड - मुळीक, वय 48 वर्षे पद - तहसिलदार, तहसिल कार्यालय चांदूर बाजार, रा.नागरवाडी बंगला शासकीय

निवासस्थान

चांदूरबाजार जि.अमरावती वर्ग - 1
2.किरण दामोधर बेलसरे, वय 29 वर्षे, रा.शिरजगाव बंड ता.चांदूर बाजार जि.

अमरावती

खाजगी व्यक्ती
घटनास्थळ ○:- तहसिल कार्यालय, चांदूर बाजार जि.अमरावती
घ. ता. वेळ. ○:- दि. 28/03/2024 चे 15.45 वा. ते 22/05/2024 चे 18.03 वा. दरम्यान
दा. ता. वेळ. ○:- दि. 24/05/2024 चे
दाखल अधिकारी ○:- मनापोकॉ.रेखा चव्हाण, ब.न. 2214 पो.स्टे.चांदूर बाजार जि.अमरावती.
हकिकत,
अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार श्री.नितीन नारायणराव धोटे, यांनी दिनांक 28/03/2024 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे वडीलांचे शेतीचे वाटणीपत्रानुसार फेरफार करणेबाबतचा आदेश काढून देणेकरीता श्री.किरण बेलसरे खाजगी इसम यांनी स्वतःकरीता व तहसिलदार श्रीमती गितांजली गरड यांचेकरीता तडजोडीअंती 20,000 /- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे तसेच दिनांक 08/05/2024 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान श्रीमती गितांजली गरड तहसिलदार चांदूर बाजार जि.अमरावती यांनी तक्रारदार यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्○ झाले आहे. करिता नमुद तक्रारदार श्री.नितीन धोटे यांनी दिलेल्या फिर्याद वरुन 1. आलोसे क्र.1 श्रीमती गितांजली नामदेवराव गरड - मुळीक, वय 48 वर्षे पद - तहसिलदार, तहसिल कार्यालय चांदूर बाजार, रा.नागरवाडी बंगला शासकीय निवासस्थान चांदूरबाजार जि.अमरावती वर्ग – 1, 2.किरण दामोधर बेलसरे, वय 29 वर्षे, रा.शिरजगाव बंड ता.चांदूर बाजार जि.अमरावती खाजगी व्यक्ती त्यांचे विरुध्द कलम 7, A, 12 भ्र.प्रति.अधि. 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला नोंद करुन तपासात घेतला.

होण्याची शक्यता नसल्याने दिसून आले. त्यामुळे पुढील पडताळणी कार्यवाही लोकसभा निवडणुकीनंतर किंवा श्री.बेलसरे यांनी लाचेचे मागणी संबंधाने माझेसोबत संपर्क केल्यावर करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर दिनांक ०८/०५/२०२४ रोजी श्री.मोहोड साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्वजण अमरावती येथून चांदूर बाजार येथे गेलो. त्याठिकाणी पो.ना.युवराज राठोड यांनी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून पंच क्र.१ डॉ.पाटील यांचेसह श्रीमती गरड, तहसिलदार व श्री.बेलसरे, लिपीक यांची भेट घेणेकरीता तहसिल कार्यालय चांदूर बाजार येथे पाठविले असता, मी श्रीमती गरड यांचे कक्षामध्ये गेलो व श्रीमती गरड, तहसिलदार यांना नमस्कार करुन **मी नितीन धोटे, माझ एक काम होत ते तुमच्या कडे आपसी वाटणीचे** असे म्हटले असता श्रीमती गरड यांनी **ह** असे म्हटले. त्यावर मी त्यांना **मी बेलसरेंना भेटलो होतो, ते म्हणत होते का बा मॅडम ले भेटून घ्या म्हणे** असे म्हटले असता, श्रीमती गरड यांनी **प्रकरण बघा लागेल ना** असे म्हटले. त्यावर मी **नाही ते तुमच्याकडे आलेले आहे ना** असे म्हटले असता, श्रीमती गरड यांनी **ठिक आहे** असे म्हणून **दाखवा ना** असे म्हटले. त्यावर मी **बेलसरेंनी मला सांगितल तयार आहे** असे म्हटले असता, श्रीमती गरड यांनी **नाही मला नाही माहीत** असे म्हटले. त्यावर मी त्यांना बेलसरे यांनी **फक्त म्हणे ते म्हणे पैसे पाहीजे म्हणे सरळ विस हजार रुपये सांगीतले मी म्हटल बा मी काही एवढे देवू शकत नाही** असे सांगितले असता, श्रीमती गरड यांनी **ह..** असे म्हटले त्यावर मी **मी बा फक्त मॅडम ले भेटतो जेवढे कमी झाले त कमी झाले, फक्त इलेक्शन च्यान मी मधात दोन वेळा आलो तुम्ही नाही भेटल्या** असे म्हटले. त्यावर श्रीमती गरड यांनी **बर** असे म्हटले. त्यानंतर बराचवेळ मी माझे कामासंबंधाने श्रीमती गरड, तहसिलदार यांचेसोबत चर्चा केली त्यावेळी श्रीमती गरड यांनी बेलसरे यांना उददेशून **काढायला सांगा, प्रकरण काढायला सांगा बघू मंग** असे म्हटले.

त्यानंतर मी श्रीमती गरड, तहसिलदार यांचे कक्षातून बाहेर येवून श्री.बेलसरे, लिपीक यांना बोलाविण्याकरीता त्यांचे कक्षात गेलो असता तेथे मला श्री.बेलसरे दिसून न आले नाही. त्य.मुळे मी पुन्हा श्रीमती गरड, तहसिलदार यांचे कक्षाकडे गेलो असता, मला श्री.बेलसरे हे श्रीमती गरड यांचे कक्षात आलेले दिसले. त्यावेळी मी श्रीमती गरड यांना **मॅडम हेच त बेलसरे आहेत तुम्ही बोलावल** असे म्हटले असता, श्रीमती गरड यांनी श्री.बेलसरे यांना उददेशून **यांचे प्रकरण ठेवा बर माझेसमोर** त्यावर श्री.बेलसरे यांनी **ठिक आहे** असे म्हटले. त्यानंतर श्रीमती गरड यांनी मला **काय विषय आहे त बघते, काढून ठेवा, थोडा वेळा थांबा, बघते मी** असे म्हटले.

त्यानंतर मी व श्री.बेलसरे असे श्रीमती गरड यांचे कक्षातून बाहेर आलो व श्री.बेलसरे यांना **फोन नाही उचलत तुम्ही** असे म्हटले असता श्री.बेलसरे यांनी **अरे मॅडम जवळ होतो ना** असे म्हटले. त्यानंतर मी त्यांना माझे प्रकरणाबाबत श्रीमती गरड यांना सांगितले बाबत म्हटले असता श्री.बेलसरे यांनी **ठिक आहे ना मंग ठेवून देवून न मॅडम समोर, मॅडम सांगे पैसे मागीतले अस झाल तस झाल** असे म्हटले. त्यावर मी त्यांना मॅडम ला मी जेवढे कमी होईल तेवढे कमी असे म्हटल्याचे सांगितले असता, श्री.बेलसरे यांनी **माया सोबत बोलायच होते न तुम्ही अधिका—यासंग बोलत असते का अशी गोष्ट** असे म्हटले. त्यावर मी त्यांना **कमी ची गोष्ट होती** असे म्हटले असता श्री.बेलसरे यांनी **हो पण अधिकारी डायरेक्ट** असे म्हणून **ठिक आहे ना मंग बोलून घेजा तुम्ही काय आहे त, मॅडम आहे तुम्ही आहे पाहून घेजा तुम्ही काय हाय त, माया त विषय संपला आता तुम्ही तिथे गेले आता त काय, मॅडम येतच जेवण करुन नंतर बघू मंग** त्यावर मी त्यांना **ठिक आहे** असे म्हटले. त्यानंतर मी व पंच क्र.१ श्री.पाटील असे तेथून श्री. **मोहोड हे** थांबलेल्या निघुन आलो, त्याठिकाणी पो.ना.युवराज राठोड यांनी माझेजवळील व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद केले.

त्यानंतर श्री.मोहोड यांनी माझे व श्रीमती गरड, तहसिलदार व श्री.बेलसरे लिपीक यांचेदरम्यान व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकविले व श्रीमती गरड यांनी माझेसोबत लाचेचे संबंधाने बोलणी केली नाही, परंतु मी त्यांना श्री.बेलसरे यांनी केलेल्या

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SURAJ PURUSHOTTAM BONDE(I (Inspector)) / 16501001669SPBM77017 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

स्टे.हा.अंमलदार
पो.स्टे.चांदूर बाजार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SURAJ PURUSHOTTA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 16501001669SPBM770

लाचेच्या मागणीबाबत सांगितले असता, त्यांनी मला **हु.. आणि बर** बोलल्या तसेच श्री.बेल यांनी मला सांगितले की, मी तुम्हाला पैसे मागीतले आहे हे मॅडमने मला सांगितले. त्यामु श्रीमती गरड, तहसिलदार यांचे मला श्री.बेलसरे यांना लाच देण्यास प्रोत्साहन असल्याचे दिसू येत असल्याचे सांगुन श्रीमती गरड, तहसिलदार यांचेकडे मला पंच क्र.१ डॉ.पाटील यांचेसह पुन्हा पडताळणीकरीता पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर श्री.मोहोड साहेब यांचे सुचनेवरुन पो.ना.युवराज राठोड यांनी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून पंच क्र.१ डॉ.पाटील यांचे रवाना केले असता, मी श्रीमती गरड, तहसिलदार यांचे दालनात गेलो व श्रीमती गरड यांनी **प्रकरण वाचा लागेल, मी बघीन उदया, आता लाईन गेली**. त्यावर मी त्यांना श्री.बेलसरे यांनी **झाल आहे म्हणते ओके** असे म्हटले असता, **मला बघीतल पाहीजे ना, मला वाचल पाहीजे, शेवटी कोण आहे काय विषय आहे** असे म्हटले. त्यानंतर मी व पंच क्र.१ श्री.पाटील असे तेथून श्री.मोहोड व सापळा पथकातील इतर सर्वजण थांबलेल्या ठिकाणी निघुन आलो, त्याठिकाणी पो.ना.युवराज राठोड यांनी माझेजवळील व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद केले. त्यावेळी पुढील पडताळणी कारवाई दिनांक १३/०५/२०२४ रोजी करण्यात ठरविण्यात येवून श्री.मोहोड साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्वजण असे शासकिय वाहनाने अमरावती येथे परत येथे येवून पंचनामा कारवाई करण्यात आली.

त्यानंतर दिनांक १३/०५/२०२४ रोजी सापळा पथकातील सर्वजण अमरावती येथून चांदूर बाजार येथे गेलो. परंतु श्रीमती गरड, तहसिलदार हया सुटीवर असल्याची माहिती मिळाल्याने पुढील पडताळणी कार्यवाही दिनांक १६/०५/२०२४ रोजी करण्यात ठरविण्यात येवून श्री.मोहोड साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्वजण असे शासकिय वाहनाने अमरावती येथे परत येथे येवून पंचनामा कारवाई करण्यात आली.

त्यानंतर दिनांक १६/०५/२०२४ रोजी सापळा पथकातील सर्वजण अमरावती येथून चांदूर बाजार येथे गेलो. त्याठिकाणी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर देवून पंच क्र.१ डॉ.पाटील यांचेसह श्रीमती गरड, तहसिलदार व श्री.बेलसरे, लिपीक यांची भेट घेणेकरीता तहसिल कार्यालय चांदूर बाजार येथे पाठविले असता, त्याठिकाणी माझी भेट श्रीमती गरड, तहसिदार व श्री.बेलसरे, लिपीक यांचेसोबत झाली. त्यावेळी श्रीमती गरड यांनी माझे वडीलांचे शेतीचे वाटणीपत्राचे काम तहसिल कार्यालयात मार्फत करता येणार नसल्याचे सांगुन निबंधक कार्यालयातून करुन घेणेबाबत सांगितले. त्यानंतर मी श्री.बेलसरे यांना भेटलो असता, त्यांनी **मॅडम सोबत बोलुन** पाहतो असे म्हटले. त्यानंतर मी व पंच क्र.१ श्री.पाटील असे तेथून श्री.मोहोड व सापळा पथकातील इतर सर्वजण थांबलेल्या ठिकाणी निघुन आलो, त्याठिकाणी पो.ना.युवराज राठोड यांनी माझेजवळील व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद केले. त्यानंतर पुढील पडताळणी कारवाई श्री.बेलसरे यांचेसोबत संपर्क झालेवर करण्याचे ठरविण्यात येवून श्री.मोहोड साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्वजण असे शासकिय वाहनाने अमरावती येथे परत येथे येवून पंचनामा कारवाई करण्यात आली.

त्यानंतर मी श्री.बेलसरे यांचेसोबत फोनव्दारे संपर्क केला, परंतु त्यांनी माझा फोन न उचलल्याने दिनांक २२/०५/२०२४ रोजी श्री.मोहोड, मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील इतर सर्वजण शासकिय वाहनाने अमरावती येथून चांदूर बाजार येथे गेलो. त्याठिकाणी पो.ना.युवराज राठोड यांनी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर देवून पंच क्र.१ डॉ.पाटील यांचेसह श्रीमती गरड, तहसिलदार व श्री.बेलसरे, लिपीक यांची भेट घेणेकरीता तहसिल कार्यालय चांदूर बाजार येथे पाठविले असता, त्याठिकाणी माझी भेट श्री.बेलसरे, लिपीक यांचेसोबत झाली. त्यावेळी श्री.बेलसरे यांनी मला तुम्ही **मॅडमला भेटून करुन टाका** असे म्हटले. त्यामुळे मी श्रीमती गरड, तहलिसदार यांचे दालनात गेलो असता, त्यांनी पुन्हा मला माझे कामाकरीता निबंधक कार्यालयात जाणेस सांगितले. त्यानंतर मी पुन्हा श्री.बेलसरे यांचेकडे गेलो असता **एकवेळ नाही म्हटल अधिका–याने त करत नाही** असे म्हटले. त्यामुळे श्रीमती गरड यांनी माझे काम करुन देण्यास नकार दिल्याने मी व पंच क्र.१ श्री.पाटील असे तेथून श्री.मोहोड हे थांबलेल्या निघुन आलो, त्याठिकाणी पो.ना.युवराज

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| -- | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

राठोड यांनी माझेजवळील व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद केले. त्यानंतर श्री.मोहोड साहेब, मी; दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्वजण असे शासकिय वाहनाने अमरावती येथे परत येवून पंचनामा कारवाई करण्यात आली. त्याठिकाणी मी श्री.मोहोड, पोलीस उपअधीक्षक यांना विनंती केली की, यापुढे तहसिल कार्यालय, चांदूर बाजार येथील तहसिलदार श्रीमती गरड हया माझेकडे लाचेची मागणी करण्याची तसेच लिपीक श्री.बेलसरे हे त्यांनी स्वत:करीता व श्रीमती गरड, तहसिलदार यांचेकरीता यापुर्वी मागणी केलेली लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता नसल्याने मी दिलेल्या तक्रारीवर पुढील कायदेशिर कारवाई करण्यात यावी. याबाबत श्री.मोहोड साहेब यांनी माझा सविस्तर जबाब नोंदविला.

अशाप्रकारे मी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक २८/०३/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान माझे वडीलांचे शेतीचे वाटणीपत्रानुसार फेरफार करणेबाबतचा आदेश काढून देणेकरीता श्री.बेलसरे, लिपीक, तहसिल कार्यालय, चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी माझेकडे स्वत: करीता व तहसिलदार श्रीमती गरड यांचेकरीता तडजोडीअंती २०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. तसेच दिनांक ०८/०५/२०२४ रोजी पडताळणी दरम्यान श्रीमती गितांजली गरड, तहसिलदार, चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी यांनी माझेसोबत लाचेचे संबंधाने बोलणी केली नाही, परंतु मी त्यांना श्री.बेलसरे यांनी केलेल्या लाचेच्या मागणीबाबत सांगितले असता, त्यांनी मला ह.. आणि बर बोलल्या तसेच श्री.बेलसरे यांनी मला सांगितले की, मी तुम्हाला पैसे मागीतले आहे हे मॅडमने मला सांगितले. त्यामुळे श्रीमती गरड, तहसिलदार यांचे मला श्री.बेलसरे यांना लाच देण्यास प्रोत्साहन असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आज दिनांक २४/०५/२०२४ रोजी श्री.मोहोड सा. मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील इतर सर्वजण असे अमरावती येथून रवाना होवून तहसिल कार्यालय, चांदूर बाजार येथे पोहचून श्री.गितांजली गरड व श्री.किरण बेलसरे यांना ताब्यात घेवून त्यांना नाव गांव विचारले असता, त्यांनी आपले नाव १) श्रीमती गितांजली नामदेवराव गरड—मुळीक, वय ४८ वर्षे, पद : तहसिलदार, चांदूर बाजार, जि.अमरावती, रा.नागरवाडी बंगला, शासकिय निवासस्थान, चांदूर बाजार, जि.अमरावती, मुळ रा.व्दारा संतोष बंडेराव मुळीक, फलॅट नं.२०१ एच—विंग, संस्कृती सोसायटी, हडपसर, पुणे व २) किरण दामोधर बेलसरे, वय २९ वर्षे, खाजगी इसम, रा. शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती असे सांगितले.

तरी आरोपी लोकसेवक १) श्रीमती गितांजली नामदेवराव गरड—मुळीक, वय ४८ वर्षे, पद : तहसिलदार, चांदूर बाजार, जि.अमरावती, ह.मु. नागरवाडी बंगला, शासकिय निवासस्थान, चांदूर बाजार, जि.अमरावती, मुळ रा.व्दारा संतोष बंडेराव मुळीक, फलॅट नं.२०१ एच—विंग, संस्कृती सोसायटी, हडपसर, पुणे व क्र.२) किरण दामोधर बेलसरे, वय २९ वर्षे, खाजगी इसम, रा. शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती यांचेविरुध्द योग्य ती कायदेशिर कारवाई होणेकरीता मी फिर्याद देत आहे.

माझी वरील नमुदप्रमाणे फिर्याद संगणकावर टाईप केली असुन मला वाचुन दाखविली, घडलेल्या घटनाक्रमानुसार बरोबर व खरी आहे.

सही

( नितीन नारायणराव धोटे )